BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)

An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research

Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत विकास

डॉ. खोकले दत्ता किशनराव

लोकप्रशासन विभाग

सहयोगी प्राध्यापक

कै. डॉ. शंकरराव सातव कला व वाणिज्य, महाविद्यालय, कळमनुरी

Email ID dkhokle123@gmail.com

Abstract:-

कोणतीही चळवळ अयशस्वी होण्यामागची कारणे ही त्या चळवळीच्या मूळ उद्देशाबाबत जनमानसात नसलेली 'जागृती' तसेच अर्धवट ज्ञान यात असतात. पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत विकास ही एक चळवळ आहे आणि पर्यावरण शिक्षण हे अत्यंत महत्त्वाचे घटक आहेत.

आपल्या भारतीय संस्कृतीत पर्यावरण रक्षणाला खुप महत्त्व दिले गेले आहे. भारत हा कृषीप्रधान देश असल्यामुळे व निसर्गाशी जीवन निगडीत असल्यामुळे तसेच देशाची कृषी व ऋषी परंपरा असल्यामुळे नैसर्गिक परिस्थितीला धोका पोहचणार नाही याची काळजी भारत वासियांनी घेतलेली आहे. परंतु भारतात पर्यावरणाचा ऱ्हास: एक संकट, पर्यावरण व आरोग्य विषयक समस्या, पर्यावरण संरक्षण काळाची गरज, पर्यावरण कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करणे, पर्यावरण संरक्षण व संवर्धन कायदे यांची पाहिजे तशी अंमलबजावणी होत नाही. प्राचीन भारतात भारतीय ऋषी मुनी पृथ्वी व नैसर्गिक वातावरणाला खुप महत्त्व देत असत. ते निसर्गाशी तल्लीन व लीन होत असत. आदरयुक्त भावनेने कल्याणाचा विचार मांडत असत. परंतु मानवाच्या हस्तक्षेपामुळे पर्यावरणातील विविध घटकांवर परिणाम होवून पर्यावरणातील विविध नैसर्गिक संसाधने तसेच विविध प्रजातीच्या अस्तित्वावर व उपलब्धतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत. मानवी हस्तक्षेप याच प्रमाणात पुढे ही चालू राहिला तर भविष्यातील मानवी पिढयांना जगण्यासाठीही कडवा संघर्ष करावा लागेल. ही परिस्थिती उदभवू नये म्हणून वेळीच जागरुक होण्याची व इतरांना पर्यावरण संरक्षणाप्रती जागृत करण्याची आज नितांत गरज आहे.

प्रस्तावना:-

पर्यावरण म्हणजे मानवाच्या सभोवतालची परिस्थिती होय. म्हणजेच आपण जिच्यावर वावरतो ती पृथ्वी तिच्यावरील हवामान, वातावरण व जैवविविधता यांचा समावेश पर्यावरणात केला जातो. नैसर्गिक पर्यावरण हे सजीवसृष्टी, जलसृष्टी, पाषाणसृष्टी व वातावरण यापासून तयार झालेले असे म्हणून नैसर्गिक पर्यावरणात जैविक व अजैविक असे दोन घटक मानले जातात व या एकंदरीत घटकांचा मानव व इतर सजीव सृष्टीच्या विकासावर परिणाम घडून येऊ शकतो.

आपल्या भारतीय संस्कृतीत पर्यावरण रक्षणाला खुप महत्त्व दिले गेले आहे. भारत हा कृषीप्रधान देश असल्यामुळे व तसेच या देशाची कृषी व ऋषी परंपरेने नैसर्गिक प्रतिकांची पूजा केलेली आहे. जीवापाड सांभाळलेले आहे. जसे नदयांना मातेचा दर्जा देणे. उदा. गंगामाता, गोदावरी माता आदी. वृक्षांना ऋषींची उपमा देण्यात आली आहे. उदा. ऋषीतुल्य वटवृक्ष, बोध्दीसत्व पिंपळ, उंबर आदि म्हणजेच नैसर्गिक संतुलन राहिले तरच पृथ्वीवरील मानव प्राणी म्हणजेच एकंदरीत जीवसृष्टीचा विकास होईल व आरोग्य सुखी राहील. भारतीय कृषी व ऋषी संस्कृतीत काही मूल्य जपण्याचा प्रयत्न भारतीय संस्कृतीने

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

केलेला आहे. म्हणून पृथ्वी सुक्तात अथर्ववेदातील ऋषींनी असे म्हटले आहे की, 'हे धरणीमातात जे काही मी तुमच्याकडून घेईल ते इतकेच असेल जे तू पुन्हा निर्माण करु शकशील.' तुझ्या मर्मस्थानावर व तुझ्या जीवनशक्तीवर कधीही आघात करणार नाही.

प्राचीन काळात सम्राट अशोक राजांशी तर त्यांच्या राज्यकारभारात पर्यावरणाला खूप महत्व दिले असल्याचे प्राचीन शिलालेखावरुन कळून येते. शेती विकास, वृक्ष लागवड, जमीन व प्राणी या संदर्भात सम्राट अशोकांनी खूप मोठे कार्य केलेले आहे.

'शाश्वत विकास' ही संज्ञा 1990 च्या दशकातील परवलीची संज्ञा आहे. विकासक्षेत्रात ही संज्ञा काही नवीन नाही. शाश्वत विकास म्हणजे दीर्घ कालावधीपर्यत परिणामकारकरित्या टिकणारा विकास, उपलब्ध साधनसामुग्रीचा योग्य आणि जास्तीत जास्त उपयोग करुन कमीत कमी अपव्यय होऊन उद्योग, ऊर्जा, शेती, वन, मत्स्य, वाहतूक, पर्यटन, पायाभूत सुविधा या सर्व आर्थिक क्षेत्रांमध्ये दीर्घ कालावधीकरीता शाश्वत उत्पादन आणि वापर होणे आवश्यक आहे. पर्यावरणावर अनिष्ट परिणाम न होऊ देता लोकांच्या मुलभूत गरजा पूर्ण करणे आणि जीवनमान सुधारणे यांवर शाश्वत विकासाच्या धोरणामध्ये अधिक भर देण्यात आला आहे. भविष्यातील पिढयांना त्यांच्या गरजा पूर्ण करण्याच्या क्षमतेबाबत तडजोड करण्याची वेळ येणार नाही अशी खबरदारी घेऊन सद्य: परिस्थितीमधील गरजा आणि आकांक्षा पूर्ण करणारा विकास' अशी शाश्वत विकासाची व्याख्या करण्यात आली आहे. सोप्या भाषेत असे म्हणता येईल की, शाश्वत विकास म्हणजे राष्ट्राची साधन संपत्ती न संपवता सामाजिक आणि आर्थिक विकास साधणे.

KEYWORDS :- पर्यावरण, शाश्वत विकास, भारतीय संस्कृती, नदया, नैसर्गिक आपत्ती, प्रदुषण, पर्यावरण संरक्षण कायदे

शोधनिबंधाची उद्दिष्टे:-

1) पर्यावण संवर्धन आणि शाश्वत विकासाचा अभ्यास करणे.
2) भारतीय संस्कृतीत पर्यावरण रक्षणाला असलेले महत्त्व स्पष्ट करणे.
3) शाश्वत विकासामार्फत टिकणारा विकास स्पष्ट करणे.

शोधनिबंधाची गृहितके:-

1) शाश्वत विकासामुळे पर्यावरण संवर्धनात बदल होत आहे.
2) पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत विकास करण्यात जनतेची भूमिका महत्त्वाची आहे.
3) पर्यावरण संरक्षणात पर्यावरण कायद्याची अंमलबजावणी महत्त्वाची आहे.

संशोधन पध्दती:-

प्रस्तुत शोधनिबंधाचे स्वरुप वर्णनात्मक संशोधन पध्दतीवर आधारित आहे.

तथ्यसंकलन:-

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व व्दितीय तथ्य संकलनाचा उपयोग केला आहे. त्यात शासकीय अहवाल, मासिके, संशोधन अहवाल, पुस्तके, वृत्तपत्रे, इलेक्ट्रॉनिक माध्यमे, वेबसाईट इत्यादींचा उपयोग करण्यात आला आहे.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

1) पर्यावरणाचा ऱ्हास:-

एक संकट मानवाने प्रगती करत असतांना नैसर्गिक पर्यावरणाची तोडमोड केल्याचे दिसून येते. प्रगतीला आवश्यक असणारे घटक निसर्गातून घेत असताना पर्यावरणाचा समतोल बिघडणार नाही याची काळजी माणसाने घ्यायला हवी होती. पण तसे झाल्याचे दिसून येत नाही. मानवाने स्वत:कडे असलेल्या ज्ञानाच्या गर्वापोटी नैसर्गिक स्त्रोतावर घाव केल्याचे दिसून येते. नैसर्गिक साधन सामुग्रीचा अतिरिक्त व अयोग्य वापर केल्यामुळे पर्यावरणास हानी पोहचलेली आहे. पर्यावरणातील विशेषत: हवेचे प्रदुषण, मातीचे प्रदुषण, पाण्याचे प्रदुषण, ध्वनीचे प्रदुषण झाल्यामुळे हवामानात बदल घडून तापमानात वाढ झालेली आहे. तापमान वाढीचा परिणाम जाणवत असून अनेक संकटे तोंड वासून उभी राहिली आहेत. निसर्गचक्र बिघडल्यासारखे वाटते. अचानक अवेळी, अतिवृष्टी, गारपीट, त्सुनामी वादळ, दुष्काळ, भुकंप या नैसर्गिक संकटाला तोंड द्यावे लागत आहे.

2) पर्यावरण व आरोग्य विषयक समस्या:-

मानव बुध्दीने प्रचंड वेगाने भौतिक, विकास करत असताना निसर्गाकडे दुर्लक्ष करत आहे. त्यामुळे निसर्गातील वातावरणात प्रदुषणाचे विष का कालवले गेले आहे. म्हणजेच हवा, पाणी, जमीन, अन्न आदिमध्ये विष वाढलेले आहे. मानवाच्या आरोग्यासाठी वरील घटक विषमुक्त असले पाहिजेत. पण सध्यातरी मानवाला चांगले अन्न, दुषीत पाणी, दुषीत हवा यामुळे अनेक रोग मानवाच्या शरीरात निर्माण झाल्याचे आज दिसून येतात. तसेच रोगट पिढी जगात निर्माण होण्याची दाट शक्यता सध्या बळावलेली आहे.

3) लोकसंख्या, गरीबी आणि आर्थिक विकास:-

गरिबी हे लोकसंख्या वाढीचे कारण आहे की परिणाम आहे. याबाबत तज्ज्ञामध्ये गेली काही दशके मतभिन्नता आहे. गरीबी आणि झपाटयाने वाढणारी लोकसंख्या या घटकांमध्ये निकटचा संबंध असल्याचे दिसते. परंतु विविध देशांमधील अभ्यासावरुन असे दिसते की, लोकसंख्या वाढ हे काही गरीबीचे कारण नाही. तर जननक्षमता हे गरीबीचे लक्षण आणि कारण आहे.

सर्वत्र सामावलेली गरीबी विकासाच्या प्रयत्नांना खिळ घालत आहे. गरीबीबरोबरच निरक्षरता, अनारोग्य, स्त्रियांचा खालावलेला दर्जा आणि पर्यावरणातील धोके सामावलेले दिसून येतात. गरीबी आणि आर्थिक संधीची अनुपलब्धता यांमुळे उपलब्ध असलेल्या त्रोटक साधन संपत्तीचे शोषण होण्यास उत्तेजन मिळते. आणि पर्यावरणाचा ऱ्हास होतो.

4) लोकसंख्या, पर्यावरण आणि शाश्वत विकास:-

अ) गेल्या काही वर्षांमध्ये झपाटयाने वाढलेली भरमसाठ लोकसंख्या.

ब) उपलब्ध नैसर्गिक साधन संपत्तीचा अयोग्य पध्दतीने वापर आणि शोषण.

क) मानव आणि पर्यावरण यांच्यातील परस्पर संबंधाबाबत आवश्यक माहितीची उणीव.

या सर्व बाबी नैसर्गिक पर्यावरणाच्या ऱ्हासाकरीता कारणीभूत ठरल्या असून, त्यामुळे पर्यावरण विषयक संकट (Ecological Crisis) निर्माण झाले आहे. 1993 साली 58 देशांत संपन्न झालेल्या राष्ट्रीय विज्ञान परिषदांनी लोकसंख्या वाढ, पर्यावरणाचा ऱ्हास आणि गरीबी या एकमेकांशी निगडीत समस्यांबाबत चिंता व्यक्त केली. या परिषदांनी असा विश्वास व्यक्त केला की, जगाची लोकसंख्या स्थिर झाल्याशिवाय जागतिक पातळीवर, पर्यावरण विषयक समस्या सोडविण्यात यश मिळणार नाही. आजच्या तरुण पिढीच्या मुलांच्या जीवनकाळात लोकसंख्या वाढीचा दर शून्य असावा हे सर्वांचे ध्येय असावे.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

5) विकसनशील देशांमधील जमिनीची धुप, वनांचा ऱ्हास आणि जागतिक तापमानातील वाढ:-

या गोष्टीचा मानवी कल्याणास आणि अस्तित्वास सध्या सर्वाधिक धोका संभवतो वाढते. शहरीकरण, पाणीपुरवठयाची वाढती मागणी, स्वच्छता, ऊर्जा जमिनीची वाढती मागणी, वाढते प्रदुषण, नैसर्गिक पर्यावरणास तसेच वन्य प्राण्यांच्या वस्तीस वाढता धोका या सर्व बाबींचा लोकसंख्या वाढीशी प्रत्यक्ष संबंध आहे.

जगाच्या एकूण लोकसंख्येचा विचार केला असल्यास असे दिसते की, जगाच्या एकूण लोकसंख्येपैकी 16% लोकसंख्या भारतात म्हणजे जगाच्या 24% भुप्रदेशावर वास्तव्यास आहे. यानुसार दरडोई जमिनीचे प्रमाण 0.27 हेक्टर इतके असून, भविष्यात हे प्रमाण घटण्याची शक्यता आहे. भारताची लोकसंख्येची घनता चीनपेक्षा दुप्पट आहे. लोकसंख्या आणि उपलब्ध भू-प्रदेश यांच्या व्यस्त प्रमाणामुळे पर्यावरण, साधनसंपत्ती, पायाभूत सोयीसुविधा, मुलभूत सेवा यांवर ताण पडतो. वाढत्या प्रदुषणामुळे जीवनमानावर (Quality of life) अनिष्ठ परिणाम झाला आहे. पर्यावरणाच्या संकटाचे कठोर सत्य, घटकी वनसंपदा, वाढते वाळवंटीकरण, महत्त्वाच्या साधनांचा ऱ्हास, घटलेली शेतजमीन, वाढत्या लोकसंख्येच्या आहाराच्या गरजा पूर्ण करण्याकरीता फार मोठया प्रमाणात वापरण्यात येणाऱ्या रासायनिक खंतामुळे, वाढत्या खाऱ्या जमीनी, वाढती आम्लता आणि वातावरणात सोडली जाणारी हानीकारक द्रव्ये अशा विविध संकटामुळे नियोजन करणाऱ्यांमध्ये आणि धोरणात्मक निर्णय घेणाऱ्यांमध्ये पर्यावरणाबाबतची जागृती झालेली दिसून येते.

6) लोकसंख्या, पर्यावरण आणि आरोग्य:-

पृथ्वीची लोकसंख्या पेलण्याची क्षमता केवळ अन्न, ऊर्जा आणि इतर साधनसंपत्तीवर अवलंबून नसून ही क्षमता पृथ्वीच्या पर्यावरणाच्या आणि वातावरणाच्या आरोग्यावर अवलंबून आहे. ही बाब शास्त्रज्ञांना समजण्यास केवळ सुरुवात झाली आहे. कोणताही धोका न पत्करण्याच्या दृष्टीने लोकसंख्यावाढीची गती कमी करणे आणि उपलब्ध साधन संपत्तीचा उपयोग अत्यंत काटकसरीने करणे आवश्यक आहे. आपल्या पृथ्वीचे वसुंधरेचे भविष्यातील आरोग्य आणि तिच्यावरील सर्व रहिवांशांचे कल्याण या दोन्ही बाबी लोकसंख्या नियंत्रण आणि निसर्ग संवर्धन (Conservaton) यांच्यावर प्रत्यक्षात अवलंबून आहेत. स्थानिक आणि जागतिक पर्यावरणाच्या गुणवत्तेवर लोकसंख्या वाढ आणि घनता याचा परिणाम होतो.

7) वसुंधरेचे आरोग्य:-

अनेक काही वर्षामध्ये मानवी लोकसंख्येच्या वाढीबरोबरच विविध विकासाच्या मानवनिर्मित साधनसुविधामुळे वसुंधरेच्या नैसर्गिक स्थितीवरील ताण असह्य होत आहे. वैश्विक तापमान वाढ, ओझोनच्या थराचे विरळीकरण अशा अनेक समस्यांनी आता अधिक गंभीर स्वरुप धारण केले आहे. निसर्गचक्रामधील हे ठळक बदल आता ठळकपणे जाणवू लागले आहेत. याचे पडसाद आपण अनुभवतो आहोत. वसुंधरेच्या वातावरणात होणारे बदल पंचमहाभूताच्या माध्यमांव्दारे मानवाला वेळोवेळी इशारे देत आहेत. उदा: दुष्काळ, महाप्रलय, चक्रीवादळे, महावर्षा, भुकंप ही सर्व लक्षणे वसुंधरेच्या ढासळत्या आरोग्याची आहेत.

ठळकपणे जाणणारे काही बदल

1) सतत बदलत्या हवामानामुळे जमिनीवरील व भूगर्भातील पाण्याच्या दर्जावरही विपरीत परिणाम होतो.
2) अनिश्चित व अनियमित पाऊस.
3) नैसर्गिक पध्दतीने परागकण वाहून नेणाऱ्या फुलपाखरांमधील घट.
4) सततच्या दुष्काळामुळे झाडझुडपांची कीड प्रतिबंधक यंत्रणा कमकुवत होते.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

5) कीटकाचा वाढता प्रादुर्भाव आणि कीटकनाशकांची वाढती निरुपयोगिता.

6) मानवी आरोग्यावर होणारे काही परिणाम:.

i) वाढत्या तापमानांमुळे हिवताप व डेंगी हे दोन्ही रोग जागतिक स्तरावर अत्यंत उग्र स्वरुप धारण करीत आहेत.

ii) संततधार पावसामुळे उंदीर, घुशी त्यांच्या बिळांमधून बाहेर पडत असतात.

iii) साठलेल्या पाण्यामुळे डासांची पैदास वाढीस लागते.

iv) कचऱ्याच्या समस्येतून माश्यांचा प्रादुर्भाव वाढतो.

v) घरदारांमध्ये भिंतीवर छतांवर बुरशीचे प्रमाण वाढते.

धुळीच्या माध्यमातून आपल्या फुप्फुसाच्या खोलवर प्रवेश करणारे कार्बनी कण, पराग कण, व बुरशीचे कण यांमुळे फुप्फुसाचा दाह, सूज असे श्वसनाचे विविध आकार व अस्थमासारखे आजार उदभवतात.

9) पर्यावरण संरक्षण आणि संवर्धन कायदे:-

पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी प्रत्येक राष्ट्रात कायदे निर्माण करण्यात आले तरीही पर्यावरणाची हानी मात्र थांबलेली नाही. हे अपयश यंत्रणेचे नसून समाजाचे आहे. मुळत: कायदा राबविणारे व कायद्याचे पालन करणारे दोघेही याबाबत जागृत व शिक्षित नसल्याचे हे द्योतक आहे.

पर्यावरणाचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने भारत सरकारने इ.स. 1986 मध्ये पर्यावरण संरक्षण कायदा सभेत केला. या कायद्यानुसार कोणत्याही उद्योजकाला उद्योग सुरु करतांना पर्यावरण व वन खात्याच्या अनुमतीचे प्रमाणपत्र आवश्यक केले आहे.

पर्यावरण संरक्षण कायद्याची वैशिष्टे:-

i) केंद्र सरकार प्रदुषण नियंत्रणासाठी प्राधिकरण स्थापन करुन त्यास अधिकार देऊ शकते.

ii) या कायद्यातील तरतुदीचा भंग केल्यास कडक स्वरुपाची शिक्षा होऊ शकते.

iii) या कायद्याने प्रदुषणास प्रतिबंध करण्याचा व प्रदुषण नियंत्रित करण्याचा उद्देश साध्य करण्यासाठी उपाययोजना करण्याचे अधिकार केंद्र सरकारला देण्यात आले आहे.

10) शाश्वत विकासाची आर्थिक आणि सामाजिक आयाम:

साधन संपत्तीचा वापर लोकसंख्येची स्थिती, आरोग्य इत्यादी वाढत्या लोकसंख्येच्या गरजा पुरविण्याकरीता सशक्त पर्यावरणाची आवश्यकता आहे. लोकसंख्या वाढीचा विचार करुन शाश्वत विकासाकरीता समग्र धोरणाची आखणी करतांना मानवी दृष्टीकोणातून विचार करणे आवश्यक आहे. एका बाजूला साधन संपत्तीची कमतरता तर दुसऱ्या बाजूला अपव्ययकारक, निर्मिती आणि अधिक वापर यांमुळे पर्यावरणाचा ऱ्हास होतो. वेगाने वाढणारी लोकसंख्या, वेगाने होणारे शहरीकरण, तसेच स्थलांतर या सर्वांमुळे पर्यावरणावर ताण पडतो.

11) लोकसंख्या आणि पर्यावरण याचे एकात्मीकरण

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

i) पर्यावरणाचा ऱ्हास थांबविण्याकरीता शाश्वत पध्दतीने नैसर्गिक साधनांचा वापर करण्यास प्रोत्साहन देण्याची आवश्यकता आहे.

ii) नैसर्गिक साधनांच्या वापराचे व्यवस्थापन शाश्वत पध्दतीने करण्याकरीता लोकसंख्येबाबतच्या सर्व उपलब्ध माहितीचा वापर करण्यात यावा.

iii) लोकसंख्या वाढीमुळे पर्यावरणावर होणाऱ्या अनिष्ट परिणामाबबात उपाययोजना करणे आवश्यक आहे.

iv) पर्यावरणाच्या स्थितीचे मूल्यमापन करताना तसेच शाश्वत विकासाकरीता नियोजन करताना लोकसंख्येच्या विविध आयामांचे एकात्मीकरण करणे आवश्यक आहे.

v) नैसर्गिक साधनांच्या वापराचे व्यवस्थापन शाश्वत पध्दतीने करण्याकरीता लोकसंख्येबाबतच्या सर्व उपलब्ध माहितीचा वापर करण्यात यावा.

निष्कर्ष:-

थोडक्यात मनुष्य प्राणी हा पर्यावरणाचा एक घटक आहे. अज्ञानापोटी व हव्यासापोटी मानवाने आज निसर्गाचे संतुलन ढासळलेले आहे. लोकसंख्या, पर्यावरण आणि दारिद्र्य निर्मुलन यांचा अंतर्भाव शाश्वत विकासाच्या धोरणांमध्ये आणि कार्यक्रमामध्ये होणे आवश्यक आहे. आजच्या पिढीच्या गरजा भागविण्याकरीता भावी पिढयांच्या गरजा भागविण्याच्या क्षमतेवर आघात करण्याची तडजोड करण्याची वेळ आपणावर येऊ नये, याकरीता अपव्ययकारक निर्मिती आणि अधिक वापर तसेच पर्यावरणावर होणारे अनिष्ट परिणाम कमी करणे आवश्यक आहे. या सर्व पर्यावरण आणि शाश्वत प्रक्रियेत सहभागी होणे आवश्यक आहे. पर्यावरण संवर्धन करावयाचे असेल आणि चळवळीची ज्योत अखंड तेवत ठेवायची असेल तर त्यांनीही जोमाने पुढे यावयास हवे. पर्यावरण संवर्धनाबाबत सतत जागरुक असणाऱ्या छत्रपती शिवरायांचा दृष्टीकोन यासाठी सर्वांना आदर्श ठरेल.

संदर्भग्रंथ:-

1) Brundtland Commission (1987) our common future. Report of the World Commission on Environment and Development.
2) Gard. S. & Sharma V. (2017) Green Marketing: An Emerging Approach to Sustainable Development.
3) Klarin, T (2018) The concept of sustainable Development: From its beginning to the contemporary Issues.
4) Bernd Klauer (1999) Defining and achieving sustainable development, International Journal of Sustainable Development & World Ecology
5) Valadbigi (1923) Sustainable Development : An overview of definitions, Issues, and challenges, Journal of Environmental science and Technology.
6) डॉ. इदनानी एल.के., पर्यावरण संरक्षण आज की जरुरत, कुरुक्षेत्र, ग्रामीण विकास को समर्पित वर्ष 54 अंक, जनवरी 2008.
7) श्रीवास्तव मयंक, ग्लोबल वार्मिंग का धरती पर प्रभाव, कुरुक्षेत्र ग्रामीण विकास को समर्पित वर्ष 54 अंक, 3 जनवरी 2008.
8) व्दिवेदी धर राहुल, मानव विकास की किंमत देता पर्यावरण कुरुक्षेत्र ग्रामीण विकास को समर्पित वर्ष 54 अंक, 3 जनवरी 2008.
9) डॉ. नीरजकुमार राय, गहराता पर्यावरण संकट, कुरुक्षेत्र ग्रामीण विकास को समर्पित वर्ष 54 अंक, 3 जनवरी 2008.